# इतिहास–राज्यशास्त्र

## उत्तरे : सराव कृतिपत्रिका 4 थी

**प्र. 1. (अ)**

(1) चित्रकला आणि शिल्पकला यांचा दृक्कलांमध्ये समावेश होतो.

(2) महाबळेश्वरजवळील भिलार हे 'पुस्तकांचे गाव' म्हणून प्रसिद्ध आहे.

(3) 'मराठी विश्वकोशां'ची रचना तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या नेतृत्वाखाली सुरू झाली.

**प्र. 1. (ब) चुकीच्या जोड्या :**


(1) दक्षिणेकडील मंदिरे – नागर स्थापत्यशैली

(2) दशावतार – त्यागराज


(3) जगाचा नकाशा व पृथ्वीगोल बनवणारा पहिला आरेखक – थॉमस कुक.

**प्र. 2. (अ)**


**(1)**




**(2)**



(3)




**प्र. 2. (ब)**

**(1) कार्ल मार्क्स :**

(१) कार्ल मार्क्स हा जर्मन विचारवंत एकोणिसाव्या शतकात होऊन गेला.

(२) त्याने 'दास कॅपिटल' हा जगप्रसिद्ध ग्रंथ लिहिला. या ग्रंथात त्याने मांडलेला वर्गसंघर्षाचा सिद्धांत महत्त्वपूर्ण मानला जातो.

(३) 'मानवी इतिहास हा वर्गसंघर्षाचा इतिहास आहे' असे त्याने म्हटले आहे.

(४) 'इतिहास हा अमूर्त कल्पनांचा नसून जिवंत माणसांचा असतो,' असे त्याचे मत होते. त्याच्या विचारसरणीवर आधारित अशी साम्यवादी शासनव्यवस्था जगात प्रथम रशियात अस्तित्वात आली.

**(2) इंडियन म्युझियम :**

(१) कोलकाता येथे असणारे इंडियन म्युझियम हे भारतातील सर्वांत मोठे आणि प्राचीन वस्तुसंग्रहालय आहे.

(२) नॅथानिएल वॉलिक या डॅनिश (डेन्मार्क) वनस्पतिशास्त्रज्ञाने १८१४ साली ते एशियाटिक सोसायटीतर्फे स्थापन केले.

(३) कला, पुरातत्त्व आणि मानवशास्त्र असे या संग्रहालयाच्या व्यवस्थापनाचे प्रमुख तीन विभाग आहेत.

(४) प्रकाशन, छायाचित्रण, प्रदर्शन, सादरीकरण, प्रतिकृती निर्मिती, जतन व संवर्धन, प्रशिक्षण, ग्रंथालय, सुरक्षा अशा विविध विभागांमार्फत म्युझियमचे काम चालते. भारताच्या सांस्कृतिक वारशातील हा एक महत्त्वाचा वारसा आहे.

**(3) खेळणी आणि उत्सव :**

खेळणी व उत्सव यांचा प्राचीन काळापासूनच घनिष्ठ संबंध आहे.

(१) विविध संस्कृतींत आणि धर्मांत उत्सवप्रसंगी विविध खेळण्यांनी सजावट केली जाते. लहान मुलांना खेळण्यांचे वाटप केले जाते. सँतॉक्लॉज नाताळमध्ये मुलांना खेळणीच देऊन जातो.

(२) दीपावलीच्या उत्सवात महाराष्ट्रात मातीच्या किल्ल्यांवर शिवराय व सैनिकांच्या प्रतिमा ठेवतात, ती खेळणीच असतात.

(३) गावोगावच्या जत्रा व उत्सवप्रसंगी बाजारात मोठ्या प्रमाणात खेळण्यांची दुकाने लागतात.

(४) बैलपोळा, नागपंचमी अशा सणांप्रसंगी मातीचे बैल, गाडी, नागोबा अशी खेळणी तयार केली जातात. मुले या खेळण्यांशी खेळतात, स्पर्धा लावतात. संक्रांतीच्या दिवशी मुले पतंग उडवतात.

**प्र. 3.**

**(1)** (१) वैज्ञानिक पद्धतीत प्रयोग आणि प्रत्यक्ष निरीक्षण यांचा वापर करून सार्वकालिक नियम मांडणे शक्य होते.

(२) इतिहास संशोधनात घटना या इतिहासात म्हणजेच भूतकाळात घडून गेलेल्या असतात.

(३) या घटनांच्या निरीक्षणासाठी आपण तेथे हजर नसतो; त्यामुळे त्या घटनांची वर्तमानात पुनरावृत्ती करता येत नाही.

(४) एका विशिष्ट घटनेवरून इतिहासात सार्वकालिक व सार्वत्रिक नियम मांडणे व ते नियम पुन्हा सिद्ध करणे शक्य होत नसते.

म्हणून इतिहास संशोधनात विज्ञानातील प्रायोगिक पद्धती व प्रत्यक्ष निरीक्षण या पद्धतींचा वापर करता येत नाही.

**(2)** (१) कठपुतळ्या किंवा चित्रांच्या साहाय्याने रामायण-महाभारतातील कथा सांगण्याची परंपरा म्हणजे 'चित्रकथी परंपरा' होय.

(२) या परंपरा आपल्या संस्कृतीच्या घटक असून, तो आपला वैभवशाली वारसा आहे.

(३) ठाकर, आदिवासी, वारली अशा जमातींनी चित्रकथी परंपरा पिढ्यान्पिढ्या टिकवून ठेवली आहे.

(४) चित्रकथी कुटुंबांमध्ये जतन करून ठेवलेल्या पोथ्या आता जीर्ण झाल्या आहेत.

म्हणून नामशेष होण्याच्या मार्गावर असलेल्या चित्रकथीसारख्या परंपरेचे पुनरुज्जीवन करणे गरजेचे आहे.

**(3)** (१) प्रसारमाध्यमांद्वारे आपल्यासमोर येणारी माहिती वास्तवाला धरून असेलच असे नसते.

(२) ही माहिती देणाऱ्या प्रसारमाध्यमांचे हेतू, सरकारी धोरण, सामाजिक परिस्थिती अशा अनेक बाजू विचारात घेणे आवश्यक असते.

(३) प्रसारमाध्यमांचे पूर्वग्रह, दृष्टिकोन हेही त्या माहितीत दडलेले असतात.

(४) जर्मनीतील 'स्टर्न' साप्ताहिकाने हिटलरने लिहिलेल्या रोजनिश्या प्रसिद्ध केल्या. पुढे ती हस्तलिखिते बनावट असल्याचे सिद्ध झाले.

म्हणून प्रसारमाध्यमांद्वारे मिळणाऱ्या माहितीचे चिकित्सक आकलन करून घ्यावे लागते.

**(4)** (१) मराठी नाटकांचा उदय कीर्तन, भारुडे, दशावतारी खेळ, कळसूत्री बाहुल्यांचे खेळ यांतून झाला. लळिते आणि लोकनाट्ये यांत मराठी नाटकांची बीजे रोवली गेली.

(२) १८४३ साली विष्णुदास भावे यांनी 'सीतास्वयंवर' या नाटकाचा यशस्वी प्रयोग सादर केला. हे पहिले नाटक त्यांनी स्वतःच रचले होते. त्यानंतर महाभारतातील कथानकावरही त्यांनी नाटक रचले.

(३) गावोगावी दौरे करून आपल्या नाटकांचे प्रयोग केले. नाटककार, दिग्दर्शक, कपडेवाला, रंगवाला इत्यादी सर्व कामेही तेच करीत असत.

(४) नाट्यप्रयोगाची निश्चित एक संकल्पना विष्णुदास भावे यांनी निर्माण केली. त्यामुळे त्यांना 'मराठी रंगभूमीचे जनक' म्हणून ओळखले जाते.

**प्र. 4.**

**(1)** कोशावर राष्ट्राची ध्येयधोरणे, जीवनमूल्ये व आदर्श, तत्त्वज्ञान आणि परंपरा या घटकांचा प्रभाव पडतो.

**(2)** इतिहास आणि कोश या दोन्हींमध्ये वस्तुनिष्ठ माहितीला महत्त्व असते.

**(3)** (१) जीवनाच्या विविध क्षेत्रांमधील ज्ञान समाजाच्या विकासासाठी उपलब्ध करून देणे ही कोशनिर्मितीची एक प्रेरणा असते.

(२) ज्ञानार्जन आणि ज्ञानप्रसार हे ध्येय मानून कोशकार कोश तयार करीत असतात.

(३) त्यामुळेच समाजाची प्रज्ञा आणि प्रतिभा यांचा आविष्कार कोशरचनेत पाहायला मिळतो.

(४) कोशांद्वारे राष्ट्रीय अस्मिता जागृत करण्याचाही प्रयत्न होत असतो. म्हणूनच कोश म्हणजे केवळ ग्रंथ न राहता ते समाजाचे मानचिन्हच समजले जाते.

प्र. 5.

**(1)** (१) समाजातील दुर्लक्षित समूहाच्या लोकपरंपरांचा इतिहास म्हणजे 'वंचितांचा इतिहास' होय.

(२) या वंचितांच्या इतिहासाचा विचार एकोणिसाव्या-विसाव्या शतकात महात्मा फुले व डॉ. आंबेडकर यांनी आपल्या लेखनात मांडला.

(३) 'गुलामगिरी' या ग्रंथात महात्मा फुले यांनी समाजातील शूद्रातिशूद्रांचा इतिहास नव्याने उलगडून दाखवला.

(४) धर्माच्या, जातीच्या आणि परंपरांच्या नावाखाली स्त्रियांचे आणि शूद्रांचे शोषण कसे होते, हे दाखवून दिले.

(५) भारताच्या राजकीय व सांस्कृतिक जडणघडणीत महत्त्वाचा वाटा असूनही भारताच्या वसाहतवादी आणि राष्ट्रवादी इतिहासलेखनात त्याकडे दुर्लक्ष झाले, हे डॉ. आंबेडकरांनी दाखवून दिले.

(६) दलितांवरील अन्याय हाच विषय त्यांच्या सर्व लेखनाचा गाभा होता. 'हू वेअर द शूद्राज' आणि 'द अनटचेबल्स' हे त्यांचे दोन ग्रंथ वंचितांच्या इतिहासावरच आहेत.

**(2)** संयुक्त राष्ट्रांच्या 'युनेस्को' या आंतरराष्ट्रीय संस्थेने ऐतिहासिक वारसास्थळांच्या संदर्भात पुढील कार्य केले आहे –

(१) नामशेष होण्याच्या वाटेवर असलेल्या सांस्कृतिक आणि नैसर्गिक वारशांचे जतन व संवर्धन कसे करावे, याची मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली.

(२) जागतिक वारसापदास पात्र ठरणारी स्थळे आणि परंपरा यांची यादी ही संघटना वेळोवेळी जाहीर करते.

(३) अशा याद्या जाहीर करून युनेस्को प्राचीन वारसा जपण्यासाठी लोकांचे व राष्ट्राचे लक्ष वेधून घेते.

**(3)** मैदानी खेळ व बैठे खेळ यांत पुढील बाबतींत फरक आहे :

| क्र. | मैदानी खेळ | बैठे खेळ |
|---|---|---|
| १. | मैदानी खेळ मैदानात उभे राहून खेळायचे असतात. | बैठे खेळ बसून खेळावे लागतात व ते घरात, मोकळ्या जागेत, पारावर, कोठेही खेळता येतात. |
| २. | मैदानी खेळांसाठी कसरतीची व कौशल्याची अधिक गरज असल्याने प्रशिक्षणाची व सरावाची गरज असते. | बैठ्या खेळांत तुलनेने कमी कसरतीची व कौशल्याची गरज असते म्हणून प्रशिक्षणाची व सरावाची गरज नसते. |
| ३. | मैदानी खेळांना शारीरिक क्षमतेची, शक्तीची गरज असते. | या खेळांना शारीरिक क्षमतेची, शक्तीची गरज नसते. |
| ४. | मैदानी खेळांत थरारकता, रोमांच असतो. आनंदही अधिक मिळतो. | बैठ्या खेळांत थरारकता नसते. रोमांच नसल्याने आनंद कमी मिळतो. |
| ५. | मैदानी खेळांमध्ये कबड्डी, हॉकी, खो-खो, क्रिकेट अशा देशी-विदेशी खेळांचा समावेश होतो. | बैठ्या खेळांत कॅरम, बुद्धिबळ, सारीपाट, पत्ते इत्यादी खेळांचा समावेश होतो. |
| ६. | बहुतेक सर्व मैदानी खेळांच्या स्थानिक व आंतरराष्ट्रीय स्पर्धा आयोजित केल्या जातात. | कॅरम, बुद्धिबळ अशा मोजक्याच बैठ्या खेळांच्या स्पर्धा सोडल्यास अन्य बैठ्या खेळांच्या स्पर्धा आयोजित केल्या जात नाहीत. |

(**टीप :** *उत्तरात फरकाचे कोणतेही तीन मुद्दे लिहिणे अपेक्षित आहे.*)

**(4)** आधुनिक काळात पर्यटन ही रोजगाराभिमुख आणि देशाच्या विकासाला मदत करणारी बाब ठरली आहे. म्हणून पर्यटनाच्या विकासासाठी अनेक प्रकारची काळजी घेणे आवश्यक आहे.

(१) पर्यटकांच्या जीविताची सुरक्षितता आणि सुरक्षित वाहतूक याकडे लक्ष देणे आवश्यक असते.

(२) पर्यटकांना उत्तम दर्जाची निवासव्यवस्था, प्रवासात उत्तम सुखसोयी व स्वच्छ प्रसाधनगृहे उपलब्ध करून दिली गेली पाहिजेत. ऐतिहासिक व प्रेक्षणीय स्थळे स्वच्छ व सुविधायुक्त ठेवली पाहिजेत.

(३) पर्यटकांना प्रेक्षणीय स्थळांची माहितीपुस्तिका, नकाशे, मार्गदर्शिका, गाईड, दुभाषे इत्यादी सोयी उपलब्ध करून देणे आवश्यक असते.

(४) दिव्यांगांच्या पर्यटनातील गरजांकडे विशेष लक्ष दिले गेले पाहिजे.

या प्रकारे विविध सोयी आणि काळजी घेतल्यासच पर्यटनाचा विकास होऊ शकतो.

**प्र. 6.**

(1) लोकशाहीचा गाभा म्हणजे सत्तेचे विकेंद्रीकरण होय.

(2) जगातील सर्वच लोकशाही राष्ट्रांपुढील मोठे आव्हान म्हणजे लोकशाहीची पाळेमुळे आणखी खोलवर नेणे.

**प्र. 7.**

**(1)** हे विधान बरोबर आहे; कारण –

(१) आचारसंहिता लागू केल्यामुळे निवडणुका खुल्या वातावरणात व निष्पक्ष पद्धतीने घेता येतात.

(२) निवडणुकीच्या काळात गैरप्रकारांना आळा घालता येतो.

(३) धाकदपटशा, दहशत यांपासून सामान्य मतदाराला दिलासा मिळून तो मुक्त वातावरणात मतदान करू शकतो. म्हणून निवडणूक आयोग निवडणुकीदरम्यान आचारसंहिता लागू करतो.

**(2)** हे विधान बरोबर आहे; कारण –

(१) राजकीय पक्ष जनतेच्या मागण्या आणि गाऱ्हाणी शासनापर्यंत पोहोचवण्याचे कार्य करतात.

(२) शासन पक्षांमार्फत आपल्या धोरणांची, योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचवून त्यांचा या कार्यक्रमांना पाठिंबा मिळवतात.

(३) या धोरणांवरील जनतेच्या प्रतिक्रिया सरकारला सांगण्याचे कामही राजकीय पक्षच करतात.

अशा रितीने राजकीय पक्ष शासन व जनता यांच्यातील दुवा म्हणून काम करतात.

**(3)** हे विधान बरोबर आहे; कारण –

(१) अर्थव्यवस्थेतील बदलांचा आणि बदललेल्या समाजव्यवस्थेचा ग्राहकांवर परिणाम होत असतो.

(२) भेसळ, वस्तूंच्या वाढवलेल्या किमती, वजन-मापातील फसवणूक, वस्तूंचा कमी दर्जा पण अधिक किमती इत्यादींसारख्या अनेक समस्यांना ग्राहकांना तोंड द्यावे लागते.

(३) अशा फसवणुकीपासून ग्राहकांचे संरक्षण करण्यासाठी १९८६ साली ग्राहक संरक्षण कायदा अस्तित्वात आला. त्यानंतर ग्राहकांना आपल्या हक्कांची जाणीव व्हावी व त्यांचे संरक्षण व्हावे, यासाठी 'ग्राहक चळवळ' अस्तित्वात आली.

**प्र. 8. (अ)**

**(1) माहितीचा अधिकार :**

(१) शासनाने केलेल्या व्यवहारांची माहिती जनतेला मिळावी, शासन आणि जनता यांच्यात सुसंवाद साधला जाऊन परस्परांविषयी विश्वास वाढावा यासाठी शासनाने २००५ साली नागरिकांना माहितीचा अधिकार दिला.

(२) या अधिकारामुळे गोपनीयतेच्या नावाखाली शासकीय कारभारातील गैरप्रकार दडपले जाऊ शकत नाहीत.

(३) शासनाचा कारभार पारदर्शी होण्यास आणि आपण जनतेला उत्तरदायी आहोत, यांची जाणीव या अधिकारामुळे शासनाला होते.

(४) माहितीच्या अधिकारामुळे लोकशाही आणि नागरिकांचे अधिकार यांचे सक्षमीकरण झाले. शासनाच्या कारभारातील गोपनीयता कमी होऊन शासनाचे व्यवहार खुले व पारदर्शी होण्यास मदत झाली आहे.

**(2) आदिवासी चळवळ :**

(१) आदिवासी हा प्रारंभापासूनच जंगलसंपत्तीवर उदरनिर्वाह करणारा समाज आहे.


(२) ब्रिटिशांनी आदिवासींच्या जंगलसंपत्तीच्या अधिकारावरच गदा आणल्याने कोलाम, गोंड, संथाळ, मुंडा यांसारख्या आदिवासींनी ब्रिटिशांविरुद्ध ठिकठिकाणी उठाव केले होते.

(३) स्वतंत्र भारतातही आदिवासींचे उदरभरणाचे प्रश्न सुटलेले नाहीत.


(४) वनजमिनींवरील त्यांचे हक्क, वनांतील उत्पादने गोळा करण्याचे व वनजमिनींवर लागवड करण्याचे त्यांचे हक्क मान्य केले जात नाहीत. या मागण्यांसाठी अनेक ठिकाणी आदिवासींची आंदोलने अद्यापही चालू आहेत.

**प्र. 8. (ब)**

**(1)**




**(2)**




**प्र. 9.**

**(1)** निवडणूक आयोग पुढील कार्ये करतो –

(१) मतदार याद्या तयार करण्याचे व त्या अद्ययावत करण्याचे काम करणे.

(२) निवडणुकांचे वेळापत्रक आणि निवडणुकीची प्रक्रिया यांचे नियोजन करणे.

(३) उमेदवारांच्या अर्जांची छाननी करणे.

(४) निवडणुका घेणे व त्यासंबंधीची सर्व कामे करणे.

(५) राजकीय पक्षांना मान्यता देणे वा मान्यता रद्द करणे.

(६) निवडणुकीसंबंधातील सर्व वाद वा तक्रारींचे निवारण करणे.

**(2)** लोकशाही मजबूत होण्यासाठी भारताने पुढील उपाययोजना राबवल्या आहेत –

(१) सत्तेचे विकेंद्रीकरण.

(२) सत्तेत वाटा मिळण्यासाठी समाजातील दुर्बल घटकांना व महिलांना आरक्षण.

(३) शासकीय पातळीवर सर्व शिक्षा अभियान, महात्मा गांधी ग्रामीण रोजगार योजना, ग्राम समृद्धी योजना असे अनेक उपक्रम राबवले जातात.

(४) समता, स्वातंत्र्य, सामाजिक न्याय, धर्मनिरपेक्षता इत्यादी मूल्यांचा संविधानाने केलेला स्वीकार.